# महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे

**'बालभारती'सेनापती बापट मार्ग, पुणे ४११००४**

(दूरध्वनी क्रमांक ०२० -२५७१६१०२ ई- मेल – pa_director@ebalbharati.in

Website : www.ebalbharati.in/www.balbharati.co.in


## सूचना

**विषय :** पाठ्यपुस्तक मंडळाच्या हीरक महोत्सवी वर्षानिमित्त बालभारतीची विविध प्रकाशने, शैक्षणिक साहित्य व उपक्रमांच्या प्रसार-प्रचारासाठी '**सोशल मीडिया सल्लागार**' सेवा उपलब्ध करून घेणे कामी दरपत्रके मागविणेबाबत...

उपरोक्त विषयाच्या संदर्भात महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ (बालभारती), पुणे यांच्या हीरक महोत्सवी वर्षानिमित्त संस्थेच्या विविध उपक्रमांची, प्रकाशनांची, डिजिटल शैक्षणिक सुविधांची तसेच विद्यार्थी, शिक्षक, वाचक व साहित्यप्रेमी यांच्यासाठी उपलब्ध असलेल्या साहित्याची माहिती अधिक व्यापक स्वरूपात जनसामान्यांपर्यंत पोहोचवायची आहे. सध्या माहिती व जनसंपर्काचे प्रमुख माध्यम म्हणून फेसबुक, इन्स्टाग्राम, युट्यूब, एक्स (ट्विटर), लिंक्डइन तसेच इतर डिजिटल माध्यमांचा व्यापक वापर करावा लागणार आहे. या माध्यमांद्वारे संस्थेची सकारात्मक प्रतिमा निर्माण करणे, प्रकाशनांची माहिती प्रभावीपणे प्रसारित करणे, विविध उपक्रमांचे दृश्य-श्राव्य स्वरूपात सादरीकरण करणे व बालभारतीच्या डिजिटल उपस्थितीस अधिक बळकटी देणे अपिक्षत आहे.

सदर कांमकाजासाठी सोशल मीडिया व्यवस्थापन, डिजिटल मार्केटिंग, सर्जनशील जाहिरातीच्या, प्रचार मोहिमांचे नियोजन व निर्मिती (व्हिडिओ निर्मिती, सामग्री विकास) या क्षेत्रातील अनुभवी व तज्ज्ञ सल्लागार/संस्था यांचे कडून ६ महीने कालावधीसाठी दरपत्रके मागवण्यात येत आहेत.

परिपूर्ण सीलबंद दरपत्रके दिनांक ०६.०८.२०२६ रोजी दुपारी ४.०० वाजेपर्यंत कार्यकारी संपादक, किशोर विभाग, 'बालभारती', पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे ४. यांचेकडे समक्ष अथवा टपालामार्फत पाठविण्यात यावीत. तसेच दरपत्रके नाकारण्याच्या अधिकार मा. संचालक, पाठ्यपुस्त मंडळ, पुणे यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली दरपत्रके स्वीकारली जाणार नाहीत.

(किरण केंद्रे)
**कार्यकारी संपादक, किशोर**
**व जनसंपर्क अधिकारी,**
**पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे ४.**

**दरपत्रक सूचना क्रमांक :** किशोर/हीरक महोत्सव, २०२६/९६
**दिनांक :** २७/०७/२०२६